महाराष्ट्र शासन
**शासकीय वैद्यकीय महाविद्यालय,अलिबाग,जि.रायगड.**
**जिल्हा सामान्य रुग्णालय परिसर, बीच रोड,अलिबाग.जि.रायगड**
Email- deangmcalibag@gmail.com Phone No. 02141-299214 www.gmchalibag.in

जा.क्रं.शावैमअ/आस्थापना-राजप/विनंम/रिक्त पदे/जाहिरात/ ३६ /२०२४ दिनांक. ०४/ ०१/२०२४

## : जाहिरात :

विषय :- सहाय्यक प्राध्यापक या संवर्गातील रिक्त असलेली पदे कंत्राटी /१२० दिवसांकरीता तात्पुरत्या स्वरुपात स्थानिक निवड मंडळ समितीच्या शिफारसीनुसार भरण्याबाबत.

संदर्भ :- १. महाराष्ट्र शासन,वैद्यकिय शिक्षण व औषधीद्रव्ये विभाग,शा.नि.क्रं.एमईडी-२०१०/प्र.क्रं.७६(अ)/२०१०/शिक्षण-१,मंत्रालय,मुंबई दिं ३१.०१.२०१२.

२. महाराष्ट्र शासन,वैद्यकिय शिक्षण व औषधीद्रव्ये विभाग,शा.नि.क्रं.पदनि-२०२०/प्र.क्रं.१०८/२०२०/वैसेवा-२,दिनांक २९.०१.२०२१.

३. शासन निर्णय क्र.राआधो-४०१९/प्रं.क्र.३१/१६-अ, दिनांक ३१.०५.२०२१.

४. शासन निर्णय क्र.संकीर्ण-२०२०/प्र.क्र.९९/आस्था-८,दिनांक १४.०६.२०२१.

५. महाराष्ट्र शासन,सामान्य प्रशासन विभाग,बीसीसी-२०२१/प्र.क्रं.३८७/१६-ब(ए), दिनांक ०६.०७.२०२१.

राष्ट्रीय आयुर्विज्ञान आयोगाच्या मानकानुसार तसेच दैनदिन रुग्णसेवेच्या व विद्यार्थ्याच्या शैक्षणिक हिताच्या दृष्टीकोनातून शासकीय वैद्यकिय महाविद्यालय,अलिबाग (जि-रायगड) येथील महाविद्यालयाच्या आस्थापनेवरील सहाय्यक प्राध्यापक ची पदे १२० दिवसांकरीता तात्पुरत्या स्वरुपात कंत्राटी तत्वावर भरण्याकरीता पात्र असलेल्या इच्छूक उमेदवारांकडून विहित नमुन्यातील अर्ज मागविण्यात येत आहे.

<u>अटी व शर्ती</u>

१. इच्छूक उमेदवारांनी दिनांक ०४/०१/२०२४ ते दिनांक १०/०१/२०२४ या कालावधीत कार्यालयीन वेळेत विहित नमुना अर्ज प्राप्त करणे.
२. अर्जात नमूद प्रमाणपत्रे व आवश्यक कागदपत्रांच्या साक्षांकिंत प्रती व अर्ज नमूना अर्जासोबत जोडणे आवश्यक आहे.
३. विहित नमुन्यातील अर्ज आवश्यक त्या प्रमाणपत्र व कागदपत्रसह कार्यालयात विहित मुदतीमध्ये आवक-जावक विभागात सादर करुन त्याबाबतची पोच घ्यावी.
४. मुलाखतीच्या ठिकाणी स्वखर्चाने उपस्थित राहावे.
५. मुलाखतीस उपस्थित न राहिल्यास उमेदवाराचा नियुक्तीकरीता विचार करण्यात येणार नाही. याची उमेदवारांनी नोंद घ्यावी.
६. तसेच मूळ प्रवर्ग (आरक्षणानुसार) उमेदवार उपलब्ध न झाल्यास गुणवत्तेनुसार/इतर प्रवर्गातील उमेदवाराचा विचार करण्यात येईल.
७. शासन निर्णय संदर्भाधीन ३०३ व ०४ अन्वये मा.सर्वोच्च न्यायालयाने विषेष अनुज्ञा याचिका क्रमांक १५७३७/१९ व इतर याचिकामध्ये दिनांक ०५.०५.२०२१ रोजी दिलेल्या निर्णयानुसार शासकीय नोक-यामध्ये नियुक्तीसाठी सामाजिक व शैक्षणिकदृष्टया मागास (एसईबीसी) प्रवर्गासाठीचे आरक्षण रद्द ठरविलेले आहे. त्या अनुषंगाने मा.सर्वोच्च न्यायालयाच्या दिनांक ०५.०५.२०२१ रोजीच्या सदर जाहिरातीमधील एसईबीसी प्रवर्गासाठी राखीव ठेवण्यात आलेली पदे अराखीव प्रवर्ग करण्यात आलेले आहे.
८. सोबत जोडलेल्या रिक्त पदांच्या तपशिलात पदांची संख्या प्रशासकीय कारणास्तव बदलण्याचे अधिकार प्रशासनास राहतील.करीता तपशिलात नमूद पदसंख्येत बदल (कमी/जास्त) होण्याची श्क्यता नाकारता येत नाही.
९. जाहिरातीच्या दिनांकापुर्वी नियुक्ती मिळणेबाबत अर्ज सादर केलेला असेल,अशा उमेदवारांनी नव्याने विहित नमुन्यातील अर्ज कार्यालयास सादर करावा.पुर्वी सादर केलेल्या अर्जाचा विचार केला जाणार नाही. याची उमेदवारांनी नोंद घ्यावी.
१०. ज्या अध्यापकांना या संस्थेत १२०दिवसांच्या कंत्राटी तत्वावर तात्पुरत्या स्वरुपात मागील विभागीयनिवड मंडळामार्फत मुलाखतीसाठी पात्र करुन नियुक्ती देण्यात आली होती,अशा

१. अध्यापकांना वगळून उर्वरीत उमेदवारांना सदरील मुलाखतीकरिता उपस्थित राहाणे बंधनकारक राहिल. सदरील प्रक्रियेत उपस्थित न राहिल्यास त्यांच्या पुढील तात्पुरत्या/कंत्राटी नियुक्तीकरिता विचार करण्यात येणार नाही.

२. तपशिलात दर्शविल्यानुसार रिक्त पदाच्या उपलब्धतेप्रमाणे प्रथम निवड झालेल्या उमेदवारांना नियुक्ती देण्यात येतील व तद्नंतर रिक्त पद उपलब्ध झाल्यास प्रतिक्षा यादीतील उमेदवारांना गुणवत्तेप्रमाणे नियुक्तीचे आदेश निर्गमित करण्यात येतील.

३. गुणवत्ता यादी ही पदव्युत्तर पदवी परिक्षेच्या एमडी/ एमएस/ किंवा समतुल्य अर्हता प्राप्त परिक्षेच्या गुणांवर ठरविण्यात येईल. संशोधन लेख,राज्य व अखिल भारतीय स्तरावरील परिषदेतील सहभाग याचा प्रधान्याने विचार करण्यात येईल.

४. उमदेवारांचे निवड करताना ज्या उमदेवारांना बंधपत्रित कालावधी पूर्ण करावयाचा आहे त्यांना प्रधान्य देण्यात येईल. तदनंतर ज्या उमेदवारांनी या संस्थेतून/ शासकीय/निमशासकीय संस्थेतून बंधपत्रित सेवा पूर्ण केली आहे, अशा उमेदवारांचा प्राधान्याने विचार करण्यात येईल.

५. उमेदवाराने धारण केलेल्या पदाचा राजीनामा द्यावयाचा झाल्यास एक महिन्याची पूर्व सूचना देणे आवश्यक आहे. अन्यथा नोटीस न देता सहाय्यक प्राध्यापक पदाचा राजीनामा दिल्यास त्यांचे एक महिन्याचे वेतन/मानधन शासन तिजोरीत जमा करण्यात येईल याची उमेदवाराने नोद घ्यावी.

## शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, अलिबाग - रायगड

### सहाय्यक प्राध्यापक रिक्त पदांचा तपशिल.

| अ.क्र | विभागाचे नांव | रिक्त पद संख्या | SC १३% | ST ७% | VJ ३% | NT -1 २.५% | NT-2 २ % | NT-3 ३.५ % | SBC २ % | OBC १९% | EWS १० % | OPEN ३८ % | TOTAL |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | शरीररचनाशास्त्र | ०१ | - | - | - | - | - | - | - | - | ०१ | - | ०१ |
| २ | शरीरक्रियाशास्त्र | ०१ | ०१ | - | - | - | - | - | - | - | - | - | ०१ |
| ३ | जीवरसायनशास्त्र | ०१ | - | - | - | - | - | - | - | - | | ०१ | ०१ |
| ४ | शरीरविकृतीशास्त्र | ०३ | ०0 | - | - | - | - | - | - | - | ०१ | ०2 | ०३ |
| ५ | न्यायवैद्यकशास्त्र | ०१ | - | - | - | - | - | - | - | - | - | ०१ | ०१ |
| ६ | बालरोगचिकित्साशास्त्र | ०१ | - | - | - | - | - | - | - | - | - | ०१ | ०१ |
| ७ | जनऔषधवैद्यकशास्त्र | ०२ | ० | - | - | - | - | ०१ | - | ०० | - | ०१ | ०२ |
| ८ | औषधवैद्यकशास्त्र | ०३ | - | - | - | - | - | - | - | ०१ | ०१ | ०१ | ०३ |
| ९ | त्वचा वगुप्तरोगशस्त्र | ०१ | ०१ | - | - | - | - | - | - | - | - | - | ०१ |
| १० | मानसोपचारशास्त्र | ०१ | - | - | - | - | - | - | - | ०१ | - | - | ०१ |
| ११ | शल्यचिकीत्साशास्त्र | ०४ | - | - | - | - | ०१ | - | ०१ | ०१ | - | ०१ | ०४ |
| १२ | अस्थिव्यंगोपचारशास्त्र | ०१ | - | - | - | ०१ | - | - | - | - | - | - | ०१ |
| १३ | स्त्रीरोग व प्रसुीशास्त्र | ०१ | ०१ | - | - | - | - | - | - | - | - | - | ०१ |
| १४ | बधिरीकरणशास्त्र | ०४ | - | ०१ | | - | - | - | - | ०२ | - | ०१ | ०४ |
| १५ | क्ष-किरणशास्त्र | ०१ | - | - | ०१ | - | - | | - | | - | - | ०१ |
| | एकूण | २६ | ०३ | ०१ | ०१ | ०१ | ०१ | ०१ | ०१ | ०५ | ०३ | ०९ | २६ |

**शैक्षणिक अर्हता** :-राष्ट्रीय आयुर्विज्ञान परिषद मान्यता प्राप्त विद्यापिठाची पदव्युत्तर पदवी(एम.डी./एम.एस.) तसेच वरिष्ठ निवासी या पदाचा एन.एम.सी. मान्यता प्राप्त (Recognised/ Permitted) वैद्यकिय महाविद्यालयातून एक वर्षाचा अनुभव असणे आवश्यक आहे.

**वेतन श्रेणी** :- सदरील उमेदवारांना दिनांक ३१.१२.२०२० च्या शासन निर्णयातील तरतुदीनुसार रुपये १,००,०००/- (एक लाख मात्र) इतके ठोक मानधन दरमहा अनुज्ञेय राहिल.

**वयोमर्यादा** :- अराखीव ४० वर्ष आणि मागासवर्गीय/आ.दु.घ./अगोदर शासन सेवेत असलेले उमेदवार ४५ वर्ष.
**मुलाखतीचा दिनांक** १२/०१/२०२४ रोजी सकाळी **११.००** वाजता.
**मुलाखतीचे ठिकाण** :- मा.अधिष्ठाता,शासकीय वैद्यकिय महाविद्यालय,अलिबाग,रायगड.यांचे दालनात.

विहित नमुन्यातील अर्जासोबत खालील शैक्षणिक अर्हतेचे प्रमाणपत्र व इतर कागदपत्रांच्या छायांकित प्रती सादर करण्यात याव्यात. तसेच मुलाखतीच्या दिवशी मुळ प्रमाणपत्रे सादर करण्यात यावी.

१.प्रथम,द्वितीय व तृतीय वर्ष एमबीबीएस गुणपत्रिकांची छायांकित प्रत.
२.प्रयत्न प्रमाणपत्र,आंतरवासिता प्रमाणपत्र.
३.एम.बी.बी.एस. पदवी उत्तीर्ण प्रमाणपत्र.
४.पदव्युत्तर परीक्षेचे गुणपत्र,प्रमाणपत्र, उत्तीर्ण आणि प्रयत्न प्रमाणपत्र.
५.एम.सी.आय. / महाराष्ट्र वैद्यकिय परिषदेचे नोंदणी प्रमाणपत्र तसेच नुतनीकरण प्रमाणपत्र.
६. एक वर्ष वरिष्ठ निवासी पदाचे अनुभव प्रमाणपत्र
७. सहाय्यक प्राध्यापक पदाचा अनुभव असल्यास, अनुभव प्रमाणपत्राची प्रत.
८.जातीचा दाखला व जात वैधता प्रमाणपत्र (लागु असल्यास).
९.३१.०३.२०२४ पर्यत वैध असलेले नॉन क्रिमिलेअर प्रमाणपत्र(लागु असल्यास).
१०.जन्म तारखेचे प्रमाणपत्र.
११.आधार कार्ड व पॅन कार्ड.
१२.उमेदवाराच्या नावात बदल असल्यास गॅजेटची प्रत.

(डॉ. पूर्वा पाटील)
अधिष्ठाता,
शासकीय वैद्यकिय महाविद्यालय,
अलिबाग(जि.रायगड)

DEAN
Government Medical Collage
Alibag-Raigad